**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानगर, पिन ४२३ १०९.
फोन नं.(०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Website - www.sai.org.in) (E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व रुग्णालये विभागाकरीता लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक व नामांकीत कंपन्या यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष,अटी / शर्ती व ई-निविदेचे माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in./tender या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.२७ /०२ /२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.०७ /०३ /२०२५ सायं ०५.०० वा पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिर्डी - ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर**

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

# श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीकरीता केमिकल/डिटर्जंट पुरविणेबाबत ई-निविदा सन २०२५-२६

**A.** **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीकरीता केमिकल/डिटर्जंट पुरविणेबाबत ई-निविदा सन २०२५-२६**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल. निविदा फी कुठल्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. Tender Id सह BOQ मधील नमूद कंपन्यांचे अधिकृत वितरक / कंपनी असल्याचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

**C. पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीकरीता पुरवावयाचे केमिकल/डिटर्जंटचे वर्णन / स्पेसिफीकेशन, कंपनी व ब्रॅण्ड BOQ मध्ये दिलेले आहे. त्याप्रमाणेच लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पुरवावे लागेल.

२. निविदा फी रक्कम रु.५,७००/- व बयाणा रक्कम रु. ९५,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

**D. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि.२५/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.०७/03/२०२५ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करावयाचा अंदाजे तपशील BoQ मध्ये देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन सदर निविदा Online सादर करावयाची आहे.

३. ई-निविदेसोबत मागणी केलेली कागदपत्रे Online सादर करावयाची आहेत. मागणी नसलेले इतर कुठलेही कागदपत्रे सादर करु नयेत. अशा कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि.१० /03 /२०२५ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

**E. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS,TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर,पॅकिंग व फॉरवर्डिग खर्च,जकात,वाराई,हमाली, प्लॅस्टीक ड्रम/ बॅरल खर्च वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार/ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/संस्थान रुग्णालये विभागामध्ये पोहोचचे वाहतूक खर्च या सर्व बाबींचा ऑनलाईन दर भरतांना विचार करुन सर्व खर्चासह दर भरावेत. तसेच पुरवठा कालावधीत वर्षातून ०२ वेळेस आपले प्रतिनिधीला शिर्डी येथे पाठवून लॉण्ड्री केमिकल वापराबाबत संस्थानचे संबंधित कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

२. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करण्यासाठी वापरलेले प्लॅस्टीक ड्रम/ बॅरल परत मिळणार नाहीत.

...०२...

३. शासन नियमानुसार सध्या लागू असलेले व वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. पुरवठादाराने online निविदेत दर भरतांना काळजी पुर्वक भरावेत नजरचुकीने दर भरले आहेत अशा सबबी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**F. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

२. कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**G. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, संस्थान रुग्णालये आणि भांडार विभाग बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल.

**H. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत सदर लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा पूर्ण केलेनंतर व पुरवठादाराने मागणी केलेनंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही. निविदेत पात्र ठरलेल्या निविदाधारकाची बयाना रक्कम ३% सुरक्षा अनामत रकमेमध्ये वर्ग केली जाईल.

२. पुरवठादाराने शिर्डी येथे समक्ष येऊन रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

**I. साहित्याचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिलेपासून एक वर्ष राहील. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट संबंधित विभागाचे मागणीप्रमाणे अगर २ किंवा ३ टप्प्यामध्ये ५० लिटरच्या ड्रम/बॅरल सह खरेदी करण्यात येईल. त्याप्रमाणे पुरवठाधारकास वर्षभर लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करावा लागेल.

२. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा दुरध्वनी/ई-मेलव्दारे कळविलेनुसार दिलेले शेडयुलप्रमाणे वेळेत करावा लागेल.

३. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पूर्ण होईपावेतो गरजेनुसार मंजूर केलेले परिमाणाइतका अगर मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेले परिमाणाइतके सर्व लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

...०३...

## J. साहित्याचा स्वीकार करण्याची पध्दत-

१. मागणी केलेले लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट परिशिष्टात (BOQ) दर्शविलेल्या स्पेसिफीकेशन/ वर्णनाचे व कंपनी/ब्रॅण्डचेच पुरवावे लागेल. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/संस्थान रुग्णालये विभागाकडील संबंधीत कर्मचा-यांनी पुरविलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटची तपासणी केल्यानंतर पुरवठा आदेशातील Specification व कंपनी/ब्रॅण्डप्रमाणे असल्यास Random Sampling व्दारे ते स्विकारले जाईल. वेगळयाच प्रकारचे, कमी दर्जाचे लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट असल्यास ते स्विकारले जाणार नाही व ते स्वखर्चाने तात्काळ परत घेवून जाणे आपलेवर बंधनकारक राहील. ते परत न नेल्यास व त्याचे नुकसान झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

२. पुरवठा करीत असलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट स्विकारले जाईल. तथापी लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट स्विकारलेनंतरही एखादा लॉट अथवा ड्रम /बॅरल मधील लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट खराब आढळल्यास सदर लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

३. ई-निविदेतील Specification/वर्णनाप्रमाणे कंपनी/ब्रॅण्डचे लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचे प्रती लिटरचे दरामध्ये ५० लिटरच्या ड्रम/बॅरलसह सर्व कर, GST, हमाली, वाराई, तसेच शिर्डी संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/संस्थान रुग्णालये/भांडार विभागात पोहोचचे वाहतूक खर्चाचा समावेश राहील. इतर कुठलाही खर्च स्वतंत्र आदा केला जाणार नाही. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट उतरविण्याची वाराई व हमाली पुरवठाधारकास द्यावी लागेल.

४. मंजूर झालेल्या दराने लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही किंवा मागता येणार नाही.

५. पुरविण्यात येणारे लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पावडर हे पर्यावरणपुरक (Eco Friendly) असावे. तसेच ते पाण्यात पुर्णपणे विरघळणारे असावे.

## K. लॅब तपासणीची कार्यपध्दती-

१ पुरविलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा लॅब तपासणी अहवाल डिलेव्हरी देतांना सोबत सादर करावा लागेल. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व रुग्णालये विभागास गरज भासल्यास पुरवठा केलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पावडरचे नमुने शासकीय अथवा शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी केली जाईल. लॅब तपासणीमध्ये पुरवठा आदेशाप्रमाणे घटकातील प्रमाण आढळून न आलेस संस्थानकडून उचित दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## L. बील आदा करण्याची पध्दती-

१. पुरविलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचे बील त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. बील संस्थानकडे सादर केलेपासून श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/रुग्णालये विभागांचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर साधारणत: ४५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापी तांत्रिक कारणांमुळे बील आदा करण्यास विलंब झाला तरीही पुरवठा थांबविता येणार नाही. तसेच बीलावर केमिकल/डिटर्जंट पावडरचा बॅच नंबर नमूद करणे आवश्यक आहे.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन केली जाईल.

४. शासन नियमानुसार कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**M. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटची मागणी ई-मेल / दूरध्वनीवरुन कळविल्यानुसार वेळेत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटच्या बिलातून वसूल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

३. निविदेतील मागणी/ वर्णनाप्रमाणे व मंजूर दराने लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

४. दुरध्वनी / ई-मेलव्दारे कळविलेल्या विहित मुदतीनंतर विलंबाने पुरवठा केलेल्या लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटवर थेट ५% दंड आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी. खरेदी विभागाकडून लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटच्या पुरवठयापोटी वेळोवेळी केलेल्या ई-मेल व भ्रमणध्वनी आणि दुरध्वनीवरील संवाद/पत्रव्यवहार हा कुठल्याही कायदेशीर कारवाईसाठी (Legitimate Actions) अत्यंत महत्वाचा भाग म्हणून गणण्यात येईल याची प्रथम प्राध्यान्याने नोंद घ्यावी.

५. पुरवठाधारकाने लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेर निविदा मागणी करुन लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा देयकाच्या देय रकमेतून वसुल करण्यात येईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंटचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. साथीच्या रोगामुळे शासनाकडून लॉकडाऊन केल्यास व त्यामुळे संस्थानकडे पुरविलेले लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट ची संस्थानला गरज नसल्यास लॉकडाऊन कालावधीमध्ये संस्थानकडे शिल्लक असलेले लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पुरवठादाराला परत स्वीकारावे लागेल.

...०५...

## N. निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या शेवटच्या तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

## O. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजूर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात साहित्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या ५० टक्के साहित्याचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण साहित्याचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

४. पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अगर पुरवठा न केल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. कोणतीही निविदा अंशतः/पूर्णतः स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

६. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

७. ई-निविदेसाठी जमा केलेली ई-निविदा फी कुठल्याही कारणास्तव वा सबबी खाली परत केली जाणार नाही.

८. तांत्रिक निविदेसोबत संस्थानने ऑनलाईन मागविलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे ऑनलाईन सादर करु नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

९. खरेदीची ई-निविदा प्रक्रीया ही महाराष्ट्र शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल.

१०. निविदेतील साहित्याचे Specification बाबत अगर निविदेबाबत काही अधिक माहिती हवी असल्यास कृपया ०२४२३-२५८७७१ अगर ०२४२३-२५८७७२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

११. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल करणे, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही,

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

## निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२५

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) ☐

२. GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती ☐

३. पॅन कार्ड ☐

४. Tender Id सह BOQ मधील नमूद कंपन्यांचे अधिकृत वितरक/ कंपनी असल्याचे प्रमाणपत्र ☐

दिनांक - / /२०२५

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

दिनांक- ---------------

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानगर.

**विषय– श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व रुग्णालये विभागाकरीता लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/ संस्थान रुग्णालये/भांडार विभागात पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा आदेशाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख/NEFT द्वारे भरणा करु. याकामी बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंट वेळेवर शिर्डी येथील श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/ संस्थान रुग्णालये/भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२५
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



1912

## SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI
## ANNEXURE FOR THE SUPPLY OF LAUNDRY CHEMICAL/DETERGENT

| Sr. no. | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | All Inclusive Rate per Unit | All Inclusive Tatal Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **डिटर्जंट पावडर (नॉक्स 100)**<br>**कंपनी/ब्रॅण्ड - Buzil Rossari, Laundrex, RevaChem, Jonson &Diversey**<br>सोडीयम लॉरिल बेनझेन सलफेट 10-20 %<br>सोडीयम मेटा सिलिकेटेड 20 -30 %<br>सोडीयम होक्सा मेटा फॉस्फाइट 10-20 %<br>सोडीयम कारबोनेट 10-20 %<br>सोडीयम ट्रायपॉली फॉस्फेट 05-10 %<br>**सर्व प्रकारचे कपडे**–बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. रंगीत/ पांढरे धुण्यासाठी | 3000 | किलो ग्रॅम | | |
| 2 | **लिक्वीड द्रवरुप साबण (नॉक्स बुस्ट/इमॅल्सिफायर)**<br>**कंपनी/ब्रॅण्ड - Buzil Rossari, Laundrex, Reva Chem, Jonson &Diversey**<br>इथाक्सीलॅरल अल्कोहोल 05 – 10 %<br>पॉलीइथीलीन ग्रालयकाल 01-05 %<br>फॉटीॲसीड/पोटॅशियम साल्ट 15-18%<br>टे ट्राकाल 05-07 %<br>इडीटीए 00 -05 %<br>सोडीयम मेटा सीलीकेट 05-10%<br>आर.ओ.पाणी 10-55%<br>**सर्व प्रकारचे कपडे**– बेडशिट, उशिकव्ह, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. रंगीत/ पांढरे धुण्यासाठी | 1100 | लिटर | | |
| 3 | **कपडे न्युट्रलाईज्ड करणेसाठी (नॉक्स सौर) पावडर**<br>**कंपनी/ब्रॅण्ड - Buzil Rossari, Laundrex, Reva Chem, Jonson &Diversey**<br>मुख्य किमान घटक फॉर्मीक ॲसिड 12 %, सिट्रीक ॲसिड 1 ते 5 % किमान प्रमाण असलेले व इतर घटक पर्यावरणास हानीकारक नसणारे पाण्यात पुर्णपणे विरघळणारा. | 1500 | किलो ग्रॅम | | |
| 4 | **हायपो ब्लिच पावडर**<br>**कंपनी/ब्रॅण्ड - Buzil Rossari, Laundrex, Reva Chem, Jonson &Diversey** | 950 | लिटर | | |

| Sr. no. | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | All Inclusive Rate per Unit | All Inclusive Tatal Amount |
|---|---|---|---|---|---|
| 5 | **लिक्वीड द्रवरुप साबण (नॉक्स वूल)**<br>**कंपनी/ब्रॅण्ड - Buzil Rossari, Laundrex, Reva Chem, Jonson &Diversey**<br>एन्झाइम्स, ब्लिच व चमकवणारा घटक नसलेला व पी एच न्युटरन नसलेला इथॅनन व युथ्यालस्टर 10% च्या कमी स्पेसिफिक गॅव्हिडी 1.003 +/- 0.01 व पुर्णपणे पाण्यात विरघळणारा | 1500 | लिटर | | |
| 6 | **लिक्वीड द्रवरुप साबण (नॉक्स बीएसआर)**<br>**कंपनी/ब्रॅण्ड - Buzil Rossari, Laundrex, Reva Chem, Jonson &Diversey**<br>पोटॅशियम इन्झाईम 01-02 %<br>लायपेज 05-10 %<br>1-4 डी ग्लुकॅन ग्लुकॅनो हायड्रोलेज 05-10 %<br>टे ट्राकाल 10-20 %<br>सोडीयम लॉरिज बेन्झाइम सल्फेट 20-30 %<br>सोडीयम सल्फेट 30-44 % | 650 | लिटर | | |

( Goraksha Gadilkar, I.A.S. )

**Chief Executive Officer**

Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi